# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८

### (सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री. अतुल भातखळकर, अस्लम शेख, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, अमर काळे, सुनिल केदार, डी.पी. सावंत, डॉ. संतोष टारफे, श्री. अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. कुणाल पाटील, अब्दुल सत्तार, शेख आसिफ शेख रशीद, वसंतराव चव्हाण, हर्षवर्धन सपकाळ, त्र्यंबकराव भिसे, श्रीमती निर्मला गावित, ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईमध्ये अनेक खाजगी शाळांनी अवैधपणे केलेल्या फी वाढी विरोधात पालकांनी केलेली निदर्शने, अनेक खाजगी व अनुदानित शाळांनी पालकांना शैक्षणिक साहित्यांची खरेदी ही शाळेमधूनच करण्याबाबत केलेली सक्ती, शासन आदेशानंतरही अनेक नामांकित शाळा प्रशासनांनी फी वाढ सुरु ठेऊन शासनाचा कायदा आपल्याला बंधनकारक नसल्याचेही सांगण्यात आल्याचे निदर्शनास येणे, फी वाढीवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने एक समिती नियुक्त करणे, अवैधपणे फी वाढ करणाऱ्या व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या शाळांची मान्यता काढून घेण्याची आवश्यकता, समितीमार्फत करण्यात येणाऱ्या शिफारशीनुसार फी वाढीबाबत योग्य तो निर्णय घेण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. गोपालदास अग्रवाल, राधाकृष्ण विखे-पाटील, अब्दुल सत्तार, सुनिल केदार, प्रा. विरेंद्र जगताप, श्री. मो. आरिफ नसीम खान, प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"गोंदिया जिल्ह्यात यंदाच्या हंगामात ६० टक्के पेक्षा कमी पाऊस पडल्यामुळे, भुगर्भातील पाण्याच्या पातळीमध्ये ३ मीटर पेक्षा जास्त झालेली घसरण, विहिरी तसेच इतर पाणी साठयांमध्ये अत्यल्प पाणी साठा असल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात निर्माण झालेली पाणी टंचाई, शासनाने दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आलेले तीनही तालुके हे गोंदिया

जिल्ह्यातील असणे, अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे तब्बल ४० मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना राबविण्याकरिता काढलेल्या निविदा प्रक्रियेवर मा.उच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती, जिल्ह्यातील पाच गावांच्या पेरा अर्बन योजनेसाठी आवश्यक प्रशासकीय मान्यतेची बाब शासनस्तरावर प्रलंबित असणे, जिल्ह्यामध्ये वारंवार निर्माण होत असलेला पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्याकरिता शासनाकडे कोणताही टंचाई आराखडा नसणे, गोंदिया जिल्ह्यात निर्माण झालेली भीषण पाणी टंचाई दूर करण्याकरिता परिपूर्ण पाणी टंचाई आराखडा तयार करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **सर्वश्री. सुनिल प्रभु, सुनिल राऊत, अशोक पाटील, प्रकाश फातर्पेकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात सुमारे २५,००० हून अधिक वृत्तपत्र विक्रेत्यांना हलाखीचे जीवन जगावे लागत असणे, वृत्तपत्र विक्रेता ऊन, पाऊस, थंडीची पर्वा न करता भल्या पहाटे वाचकांपर्यंत वृत्तपत्र पोहोचविण्याचे कार्य करीत असतांना त्यांना मिळणारे तुटपुंजे कमिशन, वृत्तपत्र मालक कंपन्यांकडून विक्रत्यांचे होत असलेले शोषण, भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा, निवृत्ती वेतन इत्यादी कोणतेही संरक्षक उपाय नसल्यामुळे उतारवयातील विक्रेते प्रकृती ठीक नसतांनाही पायपीट किंवा सायकलवरुन वृत्तपत्र विक्री करीत असणे, शासनाने वृत्तपत्र विक्रेते कल्याण मंडळ स्थापन करण्याची घोषणा करुन दोन वर्षे होऊनही कोणतीच कार्यवाही न होणे, शासनाने रस्त्याच्या कडेला वृत्तपत्र विक्रीचे स्टॉल व अनुज्ञापन देण्याचे आश्वासन, वृत्तपत्र विक्रेते व त्यांच्यावर अवलंबून असलेले सहाय्यक, त्यांचे कुटुंबिय अशा लाखो लोकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **ग्रामविकास मंत्री** : महाराष्ट्र राज्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे सन २०१३-२०१४ चे एकत्रित वित्तीय व महसूली लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(२) संसदीय कार्य मंत्री :** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये संसदीय कार्य विभागाचा सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा चौतिसावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान. (चौथा दिवस)**

(१) गृहनिर्माण विभाग.

(२) सार्वजनिक आरोग्य विभाग.

(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.

(४) आदिवासी विकास विभाग.

(५) पर्यावरण विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**पाच : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ — जी.एच.रायसोनी विद्यापीठ, अमरावती, विधेयक, २०१८.**

**(२) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ — महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०१८.**

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अबु आझमी, भारत भालके, अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ — महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरण अध्यादेश, २०१८ नापसंत करते."

(ख) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरण विधेयक, २०१८.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास सक्षम प्राधिकरण विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ — भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, अमिन पटेल, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ — भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ — भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क

(महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमित झनक, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे :-**

**सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ – महाराष्ट्र भूमिगत नळमार्ग व भूमिगत वाहिन्या (जमिनीमधील वापर हक्काचे संपादन) विधेयक, २०१८.**

---

**(ड) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, डी.पी.सावंत, बाळासाहेब थोरात, अमिन पटेल, वसंतराव चव्हाण, त्र्यंबकराव भिसे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, श्री.अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१

सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.शेख आसिफ शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अमित झनक, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – विद्युत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ – महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, राहुल बोंद्रे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(सोमवार, दिनांक १९ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

सहा : **ॲड राज पुरोहित, श्री शंभुराज देसाई, ॲड पराग अळवणी, श्री. ज्ञानराज चौगुले, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. जयप्रकाश मुंदडा, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. सुभाष साबणे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. अनिल कदम, पास्कल धनारे, किशोर पाटील, संजय केळकर, राजाभाऊ वाजे, उन्मेश पाटील, वैभव नाईक, डी. मल्लिकार्जून रेड्डी, अनिल बाबर, डॉ. राहुल आहेर, प्रा.चंद्रकांत सोनवणे, सर्वश्री महेश चौघुले, राजन साळवी, प्रा. मेधा कुलकर्णी, सर्वश्री. सुनिल प्रभु, बाबुराव पाचर्णे, उदय सामंत, राजेंद्र पाटणी, चंद्रदीप नरके, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री भरतशेठ गोगावले, समीर कुणावार,**

**मनोहर भोईर, विकास कुंभारे, अजय चौधरी, डॉ. देवराव होळी, सर्वश्री. सुनिल शिंदे, राजू तोडसाम, मंगेश कुडाळकर, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री सुभाष भोईर, किसन कथोरे, प्रकाश आबिटकर, सुरेश भोळे, प्रकाश फातर्पेकर, प्रशांत बंब, उल्हास पाटील, नरेंद्र पवार, नारायण पाटील, बाळासाहेब मुरकुटे, अशोक पाटील, सुधाकर भालेराव, हेमंत पाटील, अमित साटम, शांताराम मोरे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात मुंबई, कोकण भागात लाभलेला लांब व निसर्गरम्य समुद्र किनारा, समुद्राच्या सान्निध्यातील रॉक गार्डन, समुद्राखालील प्रवाळे व जीवसृष्टीचा आनंद लुटण्यासाठी असलेले स्कूबा डायव्हिंग व स्नार्केलिंग, छत्रपती श्री शिवाजी महाराजांची पवित्र स्मृती व शूर वीरांचा पारंपारिक इतिहास असलेले शिवनेरी, रायगड, सिंधुदुर्ग, तोरणा, मुरूड-जंजीरा, लोहगड, विजयदुर्ग, दुर्गाडी इत्यादी पुरातन व ऐतिहासिक किल्ले व जयगड, सिंहगड, प्रतापगड, माऊली इ. गड यांचे संवर्धन करण्याची आवश्यकता, दर्यासारंग सरखेल श्री. कान्होजी आंग्रे यांच्या पवित्र स्मृती जपण्याची आवश्यकता, औरंगाबादमधील जगप्रसिद्ध अजिंठा व वेरूळ लेणी व गुंफा अत्यंत जुन्या झाल्या असल्याने त्यांचे संवर्धन व पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने तेथे अत्याधुनिक योजना राबविण्याची आवश्यकता, संतभूमी महाराष्ट्रातील पंढरपुरचे विठ्ठल-रखुमाई मंदिर, कोल्हापुरचे महालक्ष्मी मंदिर, तुळजापुरचे भवानीमाता मंदिर, शिर्डीचे साईबाबा मंदिर, अष्टविनायक, शनिशिंगनापूर, भारतातल्या १२ ज्योतिर्लिंगापैकी महाराष्ट्रातील चार ज्योतिर्लिंगे, नाशिकमध्ये होणारा कुंभमेळा, आषाढी एकादशी निमित्त राज्यातून विविध ठिकाणांहून पंढरपूरच्या वारीकरिता पायी निघणारे व दिवसेंदिवस प्रवास करणारे वारकरी यांना वारीच्या मार्गात सुविधा पुरविण्याकरिता नियोजन करण्याची आवश्यकता, विदर्भातील ताडोबा, नवेगाव, बोर व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय अभयारण्य व तेथील राष्ट्रीय प्राणी व समृद्ध वनसंपदा, नागपूरमधील दीक्षाभूमी, देशाची औद्योगिक राजधानी म्हणून ख्याती पावलेले मुंबई शहर, मुंबईतील पुरातन कोळी संस्कृती तसेच फिल्म जगतात बॉलीवूड म्हणून प्रसिद्ध असलेली मुंबईची फिल्म नगरी, मुंबई शहरात असलेले जागतिक व्यापार केंद्र, श्री मुंबादेवी, श्री महालक्ष्मी, श्री सिद्धीविनायक इत्यादी प्रसिद्ध दैवते, देवी माऊंट मेरी, हाजीअलीचा दर्गा, पारशी समाजाची मंदिरे, श्री गोडीजी व श्री शांतीनाथ मंदिर, चैत्यभूमी इत्यादी विविध धर्माच्या भाविकांची श्रद्धास्थाने, तसेच गेट वे ऑफ इंडिया, मरिन ड्राईव्ह, नरिमन पॉईंट, बॅलार्ड पिअर, ससून डॉक, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक, मुंबई महापालिका इमारत, हुतात्मा चौक, काळाघोडा, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, विज्ञान भवन, एशियाटिक लायब्ररी, मुंबई विद्यापीठ, हॉर्नीमन सर्कल या ऐतिहासिक वास्तू इत्यादींचे संवर्धन व जतन करण्याची आवश्यकता, दिल्ली बोट क्लब येथून २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनादिवशी निघणा-या परेडच्या धर्तीवर मुंबईतील मरीन ड्राईव्ह ते नरीमन पॉईंटपर्यंत प्रतिवर्षी २६ जानेवारी रोजी काढण्यात येणारी भव्यदिव्य व नेत्रसुखद परेड, शैक्षणिक नगरी पुणे शहरातील पुरातन व नावाजलेल्या शिक्षणसंस्था, पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या नयनरम्य पर्वतरांगा, महाराष्ट्र राज्य पर्यटन क्षेत्रात देशभरातील प्रथम क्रमांकाचे राज्य बनविण्याच्या दृष्टीने व महाराष्ट्राची

सांस्कृतिक परंपरा वृध्दींगत करण्याकरिता नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखण्याची आवश्यकता ज्यायोगे देशभरातील व जागतिक स्तरावरील पर्यटक महाराष्ट्र राज्यात आकर्षित होऊन राज्यातील हॉटेल्स उद्योग, वाहतूक उद्योग यामध्ये वृद्धी होऊन लाखो बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल त्याचप्रमाणे राज्याच्या महसूलात वाढ होईल या दृष्टीने राज्य शासनाचे पर्यटन धोरण बनविण्याची आवश्यकता, मत्स्य उत्पादन दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे लहान आणि पारंपारिक मच्छिमारी करणा-यांवर आर्थिक संकट, कोकणातील व समुद्र किनारपट्टीतील मच्छिमारांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याकरिता मत्स्य शेती वाढविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(सोमवार, दिनांक १९ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सात : सर्वश्री. राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री भास्कर जाधव, अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, मो. आरीफ नसीम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकरराव चव्हाण, ॲड यशोमती ठाकूर, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री. अमिन पटेल, डि. एस. अहिरे, राहुल मोटे, डी. पी. सावंत, हसन मुश्रीफ, बसवराज पाटील, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, नितेश राणे, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, रणजित कांबळे, डॉ. संतोष टारफे, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशिराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, अमर काळे, अमित झनक, कु. प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, भारत भालके, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, राहुल जगताप, नरहरि झिरवाळ, अमित देशमुख, प्रदिप जाधव-नाईक, धैर्यशिल पाटील, श्रीमती सुमन पाटील, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील कायदा व सुव्यवस्था नियंत्रणाबाहेर गेल्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा व पोलिसांचाही धाक नसणे, पोलिसांवर वारंवार होणारे हल्ले, मोकाट सुटलेले सायबर गुन्हेगार, आर्थिक अडचणीमुळे पोलिसांच्या घराचा प्रश्न अधांतरी असणे, उपनगरीय गाड्यांमध्ये महिला प्रवाशांवर होणारे हल्ले व विनयभंगाचे वाढते प्रमाण, पेट्रोल चोरीचे आधुनिक तंत्र, पोलीस दलातच महिला पोलिसांवर त्यांच्या वरिष्ठांकडून होणारे अत्याचार, उच्चभ्रू वर्गात अंमली पदार्थांचा वाढता वापर, लोकप्रतिनिधींच्या पत्रांना उत्तर अथवा माहिती अधिकार कायदयानुसारही माहिती न मिळणे, त्यातून सामान्यांची होणारी उपेक्षा तसेच माहिती अधिकार

कार्यकर्त्यांवर पोलिसांचे हल्ले व माहिती देण्यास नकार, अनधिकृतपणे राज्यात सुरु असलेल्या सुरक्षा एजन्सीज, अल्पवयीन मुली व मुले यांच्यावर होणाऱ्या अत्याचारात झालेली वाढ, दरोड्याचे वाढते प्रमाण, वारंवार होणाऱ्या घरफोडी, रस्त्यावरील वाहन अपघातांचे वाढते प्रमाण, त्यात होणारी जिवीत व वित्तहानी, जातपंचायतीचा वाढता प्रभाव, भीमा-कोरेगावसारख्या घटनांमुळे दलितांमध्ये निर्माण झालेली दहशत व भीतीचे वातावरण, प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे जागेवर बसूनच वाहने प्रमाणित करण्यात येणे, वाहतुकीची मोठ्या प्रमाणात होणारी कोंडी, नियम डावलून वाहनयोग्यता प्रमाणपत्राचे वितरण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (अनुसूचित जाती/जमाती) उद्योगासाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन भत्ता योजनेची प्रभावी अंमलबजावणी न होणे, वारंवार तोट्यात चालणारे एस.टी. महामंडळ, मोडकळीस आलेल्या बसेस, परिणामी प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात येणे, अनावश्यक बुलेट ट्रेन व हायपरलुप सारख्या दिवास्वप्नांनी जनतेला घातलेली भुरळ, सागरी सुरक्षा व्यवस्थेकडे झालेले दुर्लक्ष, सागरी आयुक्तालयाची प्रलंबित मागणी, कोकणातील बंदरांचा विकास करण्याकडे झालेले दुर्लक्ष, परिणामी कोकणवासीय जनतेत शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष, राज्यात आयोजित केलेल्या मॅग्नेटिक महाराष्ट्र परिषदेच्या माध्यमातून १२ लाख १० हजार ४६४ कोटी रुपये गुंतवणुकीचे ४ हजार १०६ सामंजस्य करार झाले असल्याचा शासनामार्फत करण्यात आलेला दावा, तथापि, प्रत्यक्षात हे सर्व करार म्हणजे दिखाऊपणा असल्याचे निदर्शनास येणे, "मेक इन इंडिया" च्या धर्तीवर महाराष्ट्रात स्थापन करण्यात आलेली "मेक इन महाराष्ट्र" परिषद, तथापि, राज्यात गुंतवणूक वाढण्याऐवजी उद्योजकांनी आपली गुंतवणूक काढून घेणे, यावरुन मेक इन महाराष्ट्र ते मॅग्नेटिक महाराष्ट्र हा एक प्रकारे आभास निर्माण केला असल्याचे निदर्शनास येणे, महाराष्ट्रात सन २०२५ पर्यंत एक लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याचे स्वप्नचित्र शासन बघत असताना कारखानदारीकडे दुर्लक्ष झाल्याची खंत महिंद्रा अँड महिंद्राच्या व्यवस्थापकांनी व्यक्त करणे, विविध प्रकारच्या जाचक अटींमुळे राज्यातील उद्योग बंद पडून बेरोजगारांच्या संख्येत झालेली वाढ."

आठ : **सर्वश्री शंभुराज देसाई, प्रशांत बंब, डॉ. संजय रायमुलकर, डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री. राजाभाऊ वाजे, राजेंद्र पाटणी, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री. बाबुराव पाचर्णे, शिवाजीराव नाईक, डॉ. जयप्रकाश मुंदडा, सर्वश्री सुरेश हाळवणकर, प्रकाश आबिटकर, संतोष दानवे, अनिल बाबर, शिवाजीराव कर्डिले, उल्हास पाटील, सुधाकर देशमुख, सुभाष साबणे, उन्मेश पाटील, ज्ञानराज चौगुले, रणधीर सावरकर, किशोर पाटील, श्रीमती देवयानी फरांदे, प्रा. चंद्रकांत सोनावणे, प्रा. मेधा कुलकर्णी, श्री. हर्षवर्धन जाधव, ॲड. राहुल कुल, सर्वश्री. सुरेश धानोरकर, समीर कुणावार, अनिल कदम, डॉ. सुनिल देशमुख, सर्वश्री. शांताराम मोरे, रमेश बुंदिले, सुभाष भोईर, अनिल गोटे, सुरेश गोरे, प्रा. संगिता ठोंबरे, सर्वश्री विजय औटी, चरण वाघमारे, नारायण पाटील, डॉ. विजयकुमार गावीत, सर्वश्री. भरतशेठ गोगावले, विनायकराव जाधव-पाटील, सदानंद चव्हाण, डॉ. सुरेश खाडे, श्री. राजन साळवी, ॲड. लक्ष्मण पवार, सर्वश्री. राजेश**

**क्षीरसागर, हरिभाऊ जावळे, चंद्रदिप नरके, सुधाकर भालेराव, सत्यजित पाटील-सरुडकर, डॉ. पंकज भोयर, डॉ. सुजित मिणचेकर, सर्वश्री संजय सावकारे, संजय शिरसाट, सुरेश भोळे, योगेश घोलप, राजेंद्र नजरधने, अमित घोडा, ॲड. भिमराव धोंडे, सर्वश्री वैभव नाईक, उदेसिंग पाडवी, उदय सामंत, डॉ. आशिष देशमुख, ॲड. गौतम चाबुकस्वार, सर्वश्री. किर्तीकुमार भांगडिया, मनोहर भोईर, तान्हाजी मुटकुळे, रुपेश म्हात्रे, बाळासाहेब मुरकुटे, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री डि. मल्लीकार्जुन रेड्डी, संदिपान भुमरे, कृष्णा गजबे, डॉ. देवराव होळी, डॉ. संजय कुटे, सर्वश्री संजय केळकर, सर्वश्रीमती सीमा हिरे, स्नेहलता कोल्हे, श्री हरिष पिंपळे, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री महेश लांडगे, मोहन फड, अमल महाडिक, अतुल सावे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील सिंचनाच्या अपूर्ण असलेल्या प्रकल्पांना पुरेसा निधी उपलब्ध करणे, अनुशेषांतर्गत प्रकल्प, झुडपी जंगलांमुळे अडलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी पर्यावरणदृष्टया असलेले अडसर दूर करणे, भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामाची गती वाढवून प्रकल्पग्रस्तांचे परिपूर्ण पुनर्वसन करण्याकरिता कालबध्द कार्यक्रम राबविणे, जलवितरण व लाभक्षेत्र विकास अंतर्गत प्रत्येक सिंचन महामंडळात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत करावयाची कामे, कृष्णा खोऱ्यातून मराठवाडयासाठी २८ टीएमसी पाणी मिळण्यासाठी  पाऊल उचलण्याची गरज, पिण्याचे पाणी, औद्योगिक व कृषी वापराचे पाणी यांचे नियोजन करणे, कालव्याऐवजी पाईप लाईनने सिंचन करणे, सर्व प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे, कालव्याची व उपसा सिंचन योजनांची कामे करुन शेतकऱ्यांना जलसक्षम करणे, उपसा सिंचन योजनेवर सौरऊर्जापंप बसविणे, लाभक्षेत्राबाहेर होणारी पाण्याची चोरी रोखणे, गोदावरी व तापी खोरे जलनियोजन आराखडा तयार करणे, वैनगंगा व नळगंगा जोड प्रकल्प व कन्हान-वर्धा बोगद्याद्वारे  नदीजोड प्रकल्पाचा तातडीने अभ्यास करुन हा प्रकल्प कार्यान्वित करणे, पेणटाकळी, खडकपूर्णा, जिगाव व गोसीखुर्द इ. प्रकल्प पूर्ण करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम आखणे, राज्यातील बहुतांश पाझर तलाव सन १९७२ ते १९८० च्या दुष्काळादरम्यान तयार केलेले असल्याने त्याची सिंचन क्षमता तपासून पुनर्बांधणी करण्याची आवश्यकता, शिवकालीन बारव, पायविहिर, चौकोनी विहिर अशा प्राचीन जलस्त्रोतांचे जतन व संवर्धन करण्याची आवश्यकता, हिंगोली जिल्हयातील पूर्णा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्यासाठी व ज्या प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळालेले आहे त्या प्रकल्पांसाठी प्रशासकीय मान्यता देऊन काम सुरु करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार योजना अधिक गतीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, राज्यातील जलदगतीने पूर्ण होणाऱ्या प्रकल्पांचा पंतप्रधान सिंचन प्रकल्प योजनेत समावेश केला असणे, सन २००८ मध्ये कर्जमाफी न झालेल्या शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा व दीड लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत शासनाने केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने तसेच आदिवासी वनजमिनींचे सर्व दावे

६ महिन्यांत निकाली काढण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १३ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ५)**

(१) **श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.**

"**पन्हाळा व शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यांतील प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत**" या विषयावरील श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर व इतर, वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९२११९ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(२) **श्री. मनोहर भोईर, वि.स.स.**

"**रायगड जिल्ह्यातील भोम आणि टाकीगाव दरम्यानच्या भागातील बांधबंदिस्ती फुटल्याने भात शेतीचे झालेले नुकसान**" या विषयावरील श्री. मनोहर भोईर, वि.स.स यांचा दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ३७५ मधील प्रश्न क्रमांक ७५५९८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(३) **श्री. सुनिल प्रभु, वि.स.स.**

"**मध्य वैतरणा जलविद्युत प्रकल्पास मंजूरी देण्याबाबत**" या विषयावरील ॲड. आशिष शेलार व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९५३५६ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(४) **श्री. राहुल कुल, वि.स.स.**

"**दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मंजूर क्रीडा संकुलासाठी कृषी विभागाची जागा मिळणेबाबत**" या विषयावरील श्री. राहुल कुल व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १००८८७ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(५) **श्री. संजय सावकारे, वि.स.स.**

"**मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावर पुनर्विकास आणि इमारत बांधकाम प्रकल्पांकरिता देय असलेले प्रीमियम विकासकांनी थकविल्याबाबत**" या विषयावरील श्री. नरेंद्र मेहता व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९५५६३ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(सोमवार, दिनांक १९ मार्च, २०१८ रोजीच्या बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ६ व ७)**

(६) **श्री. सुनिल शिंदे, वि.स.स.**

"**मुंबईमधील सातरस्ता येथील आर्थर रोड कारागृह परिसरातील इमारतींच्या पुनर्विकासाबाबत**" या विषयावरील श्री. सुनिल शिंदे व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०४९४८ ला दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(७) **श्री. सुरेश गोरे, वि.स.स.**

"**चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रामध्ये कामगारांसाठी सोई-सुविधा पुरविण्याबाबत**" या विषयावरील श्री. सुरेश गोरे, वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११४९०० ला दिनांक १५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १९ मार्च, २०१८

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.